ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ पुणें, बुधवार तारीख १९ नोव्हेंबर, १९५२ अंक ४४

## विविध माहिती

**संशोधनाला नवा विषय**—लॉर्ड नफील्ड ह्यांनीं १,००,००,००० पौंड देणगी देऊन नफील्ड फौंडेशन ही संस्था स्थापन केली आहे. ही संस्था आतां एका नव्या विषयासंबंधीं संशोधन करणार आहे. शुभ्रवर्णीय लोक आणि इतर रंगाचे लोक ह्यांचे संबंध कसे आहेत आणि त्यांच्या आवडीनिवडी कोणत्या आहेत ह्यासंबंधीं संस्था संशोधन करणार आहे.

**पुस्तकें विकणारें माकड**—मद्रास येथें नुकत्याच झालेल्या पशुप्रदर्शनांत एका माकडानें सरकारी पुस्तिका विकण्याचें काम कांहीं दिवस बिनबोभाट पार पाडलें. पुस्तकाची किंमत त्याच्या हातावर ठेवतांच माकड एक एक प्रत गिऱ्हाइकांना देत असे. माकडानें बरीच गिऱ्हाईकी केल्याचें समजतें.

**सरकारी गहाणाचीं दुकानें**—ब्रह्मदेशाचें सरकार गहाणावर कर्ज देणारें पहिलें दुकान इनसाइन येथें लवकरच उघडणार आहे. हा प्रयोग यशस्वी झाल्यास सर्व देशभर छोट्यामोठ्या वस्तूंच्या तारणावर कर्जे देण्याची व्यवस्था सरकार करणार आहे.

**रशिआ-अफगाणिस्थान व्यापार**—अफगाणिस्थान आणि रशिआ ह्यांच्या दरम्यान झालेल्या १९५० च्या व्यापारी तहान्वयें उभयतां राष्ट्रांत एक नवा उप-करार करण्यांत आला आहे. ह्या उप-कराराप्रमाणें एकमेकांना पुरविण्यांत येणाऱ्या मालाच्या किंमती दरवर्षी ठरविण्यांत येणार आहेत. अफगाणिस्थान रशिआला लोकर, कापूस व फळें पुरवितो आणि पेट्रोल, साखर, कापड व कांचेचें सामान घेतो.

**चमत्कार पण खरा**—डेट्रॉइट येथील एका बिस्किटाच्या दुकानांतून एका बाईनें आठ रोल्स उचलले आणि पैसे न देतां ती निघून गेली. ही गोष्ट एका गुप्त पोलिसानें पाहिली. त्यानें बाईला कोर्टांत खेचलें. मॅजिस्ट्रेटनें पुराव्याच्या अभावीं बाईला सोडून दिलें, कारण ते रोल्स तिनें केव्हांच खाऊन टाकले होते.

**ग्रामोद्योगांची तपासणी**—भारतीय नियोजन-मंडळाच्या सूचनेप्रमाणें कांहीं ग्रामोद्योगांची सर्वांगपूर्ण अशी एक तपासणी करण्यांत येणार असल्याचें समजतें. ज्या ग्रामोद्योगीय वस्तूंना परदेशी बाजारपेठ मिळूं शकते, त्यांचीच तपासणी करण्यांत येणार आहे.

**भाताच्या नव्या जाती**—प. गोदावरी जिल्ह्यांतील कोलेरू तळ्याच्या आसपासच्या भागांत येऊं शकणाऱ्या भाताच्या दोन नव्या जाती शोधून काढण्यांत आल्या आहेत. मद्रास राज्यांत पुला येथें खोल पाण्यांत येऊं शकणाऱ्या भाताविषयीं संशोधन करणारें केंद्र आहे. तेथें ह्या जातींचा शोध लावण्यांत आला.

**पाकिस्तानमधील बोलपटाचा धंदा**—लाहोर येथील चित्रपट वितरकांनीं आपल्या नौकरवर्गापैकीं ५० टक्के नौकरांना कामावरून दूर केलें आहे. पाकिस्तान सरकारनें भारतीय बोलपटांना बंदी केल्यामुळें त्यांनीं नुकसान टाळण्याचा हा मार्ग स्वीकारला आहे.

**भारताची चहाची निर्यात**—चालू फडणिशी वर्षाच्या पहिल्या तीन महिन्यांत भारतानें ६,००,००,००० पौंड चहा निर्यात केला असें अधिकृत रीत्या जाहीर झालें आहे ह्या चहाची किंमत सुमारें १०,००,००,००० रुपये होईल.

**भारतांत ५७ अमेरिकन तंत्रज्ञ**—भारत व अमेरिका ह्यांच्या दरम्यान करण्यांत आलेल्या तांत्रिक सहाय्याच्या कराराप्रमाणें भारतांत सध्या ५७ अमेरिकन तंत्रज्ञ काम करीत आहेत. १९५० पासून भारतांत ७० अमेरिकन तंत्रज्ञ आले. त्यांच्यापैकीं १३ जण आपलीं कामें संपवून परत गेले. ५७ पैकीं ३६ जण शेतीसुधारणायोजनेसंबंधीं मार्गदर्शन करीत आहेत.

**ब्रिटनमध्यें अमेरिकन बनावटीची मोटार**—अमेरिकन बनावटीची एक मोटार ब्रिटनमध्यें तयार करण्यांत येऊन मग ती अमेरिकेंत विक्रीसाठी पाठविली जाणार आहे. ही मोटार १९४९ सालीं डेट्रॉइट (अमेरिका) येथें तयार करण्यांत आली असून आतां त्या नमुन्याप्रमाणें इंग्लंडमधील ऑस्टिन कंपनी मोटारी तयार करणार आहे. गाडी स्पोर्टस मॉडेलची आहे.

**निजामाच्या स्नुषेला १० लाख रुपये**—निजामाचे दुसरे पुत्र, प्रिन्स मोआझम ह्यांच्या बायकोनें नुकताच घटस्फोट घेतला. त्यावेळीं तिला १० लाख रुपये देण्यांत आले. घटस्फोट घेण्यापूर्वी तिला दरसाल १ लाख रुपये निजामानें करून ठेवलेल्या ट्रस्टमधून मिळत असत. ह्या बाईचें नांव निलोफर असून ती एका तुर्की सरदाराची मुलगी आहे

**इंदुरच्या गिरणीनें बोनस दिला**—इंदूरमधील कल्याणमल गिरणीच्या चालकांनीं आपल्या कामगारांना ६ महिन्याचा पगार बोनस म्हणून देण्याचें जाहीर केलें आहे. गिरणींत काम करणाऱ्या मजुरांची संख्या सुमारें ४,००० आहे. बोनस कोणत्या साला्चा आहे तें मात्र स्पष्ट करण्यांत आलेलें नाहीं.

**कापडाच्या बाजारपेठांचा शोध**—आग्नेय आशियांत हिंदी कापड खपविण्याची शक्यता अजमावून पहाण्यासाठीं भारतीय सरकारनें श्री. नायर नांवाच्या एका अधिकाऱ्याला त्या देशांत प्रवास करण्यासाठीं पाठविण्याचें ठरविलें आहे. मलाया, ब्रह्मदेश, इंडोनेशिआ व सीलोन ह्या देशांत श्री. नायर दौरा करणार आहेत.

## विनापरवाना रेडिओमुळें २५ लाखांचें नुकसान

परवाना घेतल्याशिवाय रेडिओ वापरण्यामुळें भारतीय सरकारचें दरवर्षी सुमारें २५ लाख रुपयांचें नुकसान होतें, असा अंदाज करण्यांत आला आहे. मार्च, १९४६ ते डिसेंबर, १९५१ ह्या काळांत रेडिओच्या परवान्यांची संख्या २,३२,३६८ वरून ६,३५,०२६ पर्यंत वाढली. ह्याच काळांत परदेशाहून सुमारें ४,२०,००० सेट्स आयात करण्यांत आले आणि सुमारें २ लाख भारतांतच तयार करण्यांत आले. गेल्या वर्षाच्या अखेरपर्यंत २ लाख रेडिओ वापरणाऱ्या लोकांनीं परवाने घेतले नव्हते, असा अदाज आहे. विगर परवान्याच्या रेडिओची संख्या कमी करण्याकरतां एका परवान्यावर एकापेक्षा अधिक रेडिओ वापरण्याची सध्या असलेली सवलत सरकार रद्द करण्याचा विचार करीत आहे, असें समजतें. सध्याच्या नियमाप्रमाणें एका व्यक्तीला एका परवान्यावर एकाच पत्त्यावर वाटेल तेवढे रेडिओ सेट्स वापरता येतात. पुष्कळ लोक आपल्या परवान्याच्या आधारावर सेट विकत घेतात आणि तो स्नेह्यांना देतात. हे स्नेही १५ रुपये परवाना फी न भरतांच रेडिओ सर्रास वापरतात आणि सरकारचें नुकसान करतात, असें आतां दिसून आलें आहे. सरकारनें कायद्यांत दुरुस्ती केल्यावर असें करणें शक्य होणार नाहीं. रेडिओचे व्यापारी मात्र ह्या दुरुस्तीच्या विरुद्ध आहेत. त्यांचें म्हणणें असें कीं, अशा दुरुस्तीमुळें संबंधित अधिकारी व्यापाऱ्यांना त्रास देतील. शिवाय, संकल्पित दुरुस्ती जगांतील ह्यासंबंधींच्या पद्धतीविरुद्ध आहे. सध्या बिगर–परवाना रेडिओ वापरणें हा नागरी स्वरुपाचा गुन्हा आहे; फौजदारी नाहीं. तो फौजदारी करून पोस्ट ऑफिसांना गुन्हेगारांना दंड करण्याचे अधिकार दिल्यास रेडिओ परवान्यांची तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्यांचें काम सुलभ होईल. हें मात्र खरें.

## 'टेलिव्हिजन' चे विपरीत परिणाम

शास्त्रीय शोधांचा दुरुपयोग केला जात असल्याचीं अनेक उदाहरणें आजच्या जगांत सांपडतात. सिनेमाचा असा दुरुपयोग होत असल्याची तक्रार आतां जुनी झाली आहे. सिनेमा पाहून मुलें गुन्ह्याच्या नवीन तऱ्हा शिकतात आणि त्यांची नीतिमत्ता खालावते असेंही सांगण्यांत येतें. अर्थात् दुष्परिणाम घडवून आणणारे चित्रपट काढणाऱ्यांचा हा दोष आहे. अमेरिकेंत टेलिव्हिजनाचा कसा दुरुपयोग करण्यांत येत आहे, तें 'जर्नल ऑफ दि अमेरिकन मेडिकल असोसिएशन'नें दाखवून दिलें आहे. टेलिव्हिजनवर प्रक्षेपित करण्यांत येणारे कार्यक्रम पाहिल्यावर कित्येक अमेरिकन मुलें झोपेंत भीतीनें किंचाळतात आणि आपलें डोकें उशीखालीं लपवितात अशी माहिती वरील नियतकालिकानें दिली आहे. टेलिव्हिजनवर भय निर्माण करणारे प्रसंग आणि गुन्ह्यांच्या कथा दाखविल्यामुळें मुलांच्या अंतःकरणांत भय ठाण करून बसतें. ७६ टक्के मुलें चित्त बावरल्यासारखी वागूं लागलेलीं आढळून आलीं, ८५ टक्के मुलांना शांत झोपच लागेनाशी झाली, ९५ टक्के मुलांची भीतीची भावना ५ पट वाढल्याचें आढळून आलें आणि ५१ टक्के मुलांना नखें खाण्याची खोड लागली. त्याशिवाय बहुतेक मुलांची भूक कमी झाली, कित्येकांना शाळेंत नीट वागणें जमेनासें झाले आणि कित्येक जास्त जास्त चिडखोर बनूं लागलीं. अमेरिकन चित्रपटांबाबत ज्या तक्रारी करण्यांत येतात त्याच आतां टेलिव्हिजनच्या कार्यक्रमाबाबतहि करण्यांत येऊं लागलेल्या दिसतात. 'टेलिव्हिजन' चा व्यवसाय करणाऱ्यांनीं हे वाईट परिणाम करणारे कार्यक्रम दाखवूं नयेत अशी विनंती जर्नलनें केली आहे.

## फौंटनपेन्स तयार करण्याचा कारखाना

पायलट पेन कंपनी (इंडिआ) लि. ह्या कारखान्याचा उद्घाटन समारंभ नुकताच झाला. ह्या कारखान्यांत फौंटनपेनला लागणारी शाई तयार होऊं लागली असून १९५३ च्या प्रारंभीं फौंटनपेन्सहीं तयार होऊं लागतील. शाईच्या उत्पादनाच्या कामीं पांच जपानी तंत्रज्ञांचें सहकार्य लाभलें आहे. भारतांत मिळणाऱ्या उत्कृष्ट कच्च्या मालापासून शाई तयार करण्यांत येत असून ती चांगल्या प्रकारची आहे, असें म्हणतात. भारताला आज बऱ्याच प्रकारचा स्टेशनरी माल परदेशांकडून आयात करावा लागतो. त्या दृष्टीनें ह्या कारखान्याचें स्वागतच करणें इष्ट आहे. कारखान्यांत तयार होणारीं फौंटनपेन्स ५ ते १० वर्षे तरी टिकतील आणि त्यांच्या किंमती ग्राहकांच्या आटोक्यांत रहातील, अशा बेतानें कारखाना उभारण्यांत आला आहे. कारखान्याची सध्याची मासिक उत्पादनक्षमता ५०,००० फौंटन पेन्सची आहे. पण मागणी वाढल्यास उत्पादन अधिक वाढवता येण्यासारखें आहे. कारखान्याच्या मॅनेजिंग डायरेक्टरांनीं असें म्हटलें आहे कीं, कारखान्याच्या उत्पादनामुळें ग्रामोद्योगाच्या पायावर फौंटनपेन्स तयार करणाऱ्यांना स्पर्धा वाटण्याचें कारण नाहीं. कारण, कारखान्याचें गिऱ्हाईक अगदींच वेगळें आहे. मद्रास राज्याच्या अर्थमंत्र्यांनीं कंपनी काढणारांचें अभिनंदन करतांना असे उद्गार काढले कीं, भारतांत अधिकाधिक कारखाने निघणें तर इष्ट आहेच, पण त्याचबरोबर मालाचा दर्जाही चांगला राखण्याकडे लक्ष पुरविलें पाहिजे. भारतांत आयात होणाऱ्या परदेशी शाईची स्पर्धा कमी करण्यासाठीं ह्या धंद्याला संरक्षण मिळालें पाहिजे, अशी मागणी कारखान्याच्या मॅनेजिंग डायरेक्टरांनीं केली.

## बनावट सौंदर्यप्रसाधनांपासून धोका

ब्रिटनमधील 'लॅन्सेट' ह्या वैद्यकीय साप्ताहिकानें सौंदर्यप्रसाधनांच्या वापरानें चामडीचे रोग होण्याचा धोका असतो, असें मत नुकतेंच जाहीर केलें आहे. हा इशारा अर्थातच खऱ्याखुऱ्या सौंदर्यप्रसाधनांबाबत दिलेला आहे. दिल्लीला बनावट सौंदर्यप्रसाधनें तयार करणारा एक कारखाना गुप्त पोलिसांनीं उघडकीस आणला आहे. अशा बनावट सौंदर्यप्रसाधनांपासून स्त्रियांच्या सौंदर्याला किती तरी अधिक पटीनें मोठा धोका पोंचेल हें उघडच आहे. वरील कारखान्यांत लेबलें कायम असणाऱ्या स्नो, क्रीम व वासाच्या तेलाच्या हजारों बाटल्या पोलिसांना आढळून आल्या. घरोघरीं हिंडून जुन्या बाटल्या स्त्रियांच्याकडून विकत घ्यावयाच्या व त्यांत बनावट व हीन प्रतीचा माल भरून तो बाजारांत विकावयाचा असा प्रकार वरील कारखान्यानें चालविला होता. त्याचबरोबर, प्रसिद्ध कंपन्यांचीं लेबलेंहि तयार करण्यांत येत असत. पोलिसांकडे एका कंपनीनें तक्रार केल्यावरून त्यांनीं शोध केला, तेव्हां एका ठिकाणीं स्नोच्या रिकाम्या ८६ बाटल्या, १०० खोटीं लेबलें व इतर साहित्य पोलिसांना मिळालें. दुसऱ्या एका ठिकाणीं एका प्रसिद्ध कंपनीच्या 'व्हॅनिशिंग क्रीम'चीं ४९५ लेबलें आणि स्नोचीं ४७५ लेबलें सांपडलीं. सौंदर्य प्रसाधनें म्हटलीं कीं बाजारांत मिळणाऱ्या बाटल्याच अलीकडे सर्वांच्याच नजरेसमोर येतात. भारतांत प्राचीन काळापासून स्त्रिया सौंदर्यप्रसाधनें वापरीत आलेल्या आहेत. मेंदी लावण्यासारखे कांहीं प्रकार अद्यापहि माहित असले तरी बहुतेक स्त्रियांना प्राचीन सौंदर्यसाधनें फारशी परिचित नसतात. आपल्याकडील आयुर्वेदिक कारखान्यांनीं ह्या बाबतींत लक्ष घालून जुनीं साधनें नव्यानें देण्यासारखीं आहेत.

# अर्थ

बुधवार, ता. १९ नोव्हेंबर, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## शेतीच्या धंद्यासाठी मध्यवर्ती क्रेडिट कॉर्पोरेशनची आवश्यकता

### बर्कले परिषदेची फलश्रुति : श्री. वर्दे ह्यांच्या सूचना

बर्कले ( कॅलिफोर्निया, यू. एस. ए. ) येथें ऑगस्ट ४ ते सप्टेंबर १२ अखेर आंतरराष्ट्रीय शेती-सहकारी क्रेडिट परिषद भरली होती. ह्या परिषदेंत मुख्यतः मागासलेल्या विभागांच्या उद्धाराचाच विचार झाला. अतिपूर्व, मध्यपूर्व, उत्तर आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका येथील ३४ देशांचे वतीनें ७० प्रतिनिधींनीं परिषदेंत भाग घेतला. भारतातर्फे चार प्रतिनिधी उपस्थित होते, त्यांत मुंबई राज्य सहकारी बँकेचे ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. वा. पुं. वर्दे, हे एक प्रमुख होते. भारतांत ते नुकतेच परत आले आहेत. " अर्था " च्या प्रतिनिधीनें, परिषदेच्या फलश्रुतीसंबंधीं त्यांची मुलाखत घेतली, तेव्हां ते म्हणाले, कीं भारतांतील शेतकऱ्यांच्या चिकट कर्जबाजारीपणाविषयीं आणि शेतकऱ्यांना कर्जपुरवठ्याविषयीं आजवर कित्येक कमिट्यांनीं कितीतरी वेळा चौकशा व रिपोर्ट केले, तरी अद्याप समाधानकारक मार्ग सांपडलेला नाहीं. अशा परिस्थितींत, श्री. वर्दे ह्यांच्या मतें, बर्कले परिषदेंतील चर्चा निश्चितपणें मार्गदर्शक होण्याजोगी आहे.

परिषदेंतील चर्चेची फलश्रुति स्पष्ट करणारा एकादा रिपोर्ट तयार करण्यांत आला आहे काय ? असें त्यांना विचारता, ते म्हणाले कीं ( १ ) सरकारनें करावयाचे कायदे, ( २ ) परराष्ट्रीय मदत आणि ( ३ ) शिक्षण ह्या तीन विभागांत, परिषदेच्या रिपोर्टामध्यें कितीतरी मौल्यवान् सूचना करण्यांत आल्या आहेत. शेती-सहकारी क्रेडिटबाबत राष्ट्रीय धोरण आंखलें जाण्याचें महत्त्व रिपोर्टानें प्रतिपादन केलें आहे. कर्ज देतां-घेतां यावें, सुलभ व्हावें आणि त्यासाठी पत संस्था स्थापता याव्या, ह्यासाठी कायद्यांत आवश्यक त्या दुरुस्त्या करण्याचें अगत्यहि रिपोर्टानें स्पष्ट केलें आहे.

" भारताच्या प्रतिनिधी मंडळानें, हिंदी परिस्थिति लक्षांत घेऊन, कांहीं सूचना केल्या का ? " ह्या प्रश्नास उत्तर देतांना श्री. वर्दे ह्यांनीं हिंदी प्रतिनिधी मंडळाच्या चार प्रमुख सूचनांचा उल्लेख केला:-( १ ) राष्ट्रीय शेती-पत-पुरवठ्याच्या संस्थांची स्थापना, ( २ ) अल्प मुदतीच्या गरजांसाठी स्थानिक व प्रादेशिक बचतीचा उपयोग करणें, आणि दीर्घकालीन शेती सुधारणेसाठी परराष्ट्रीय मदत मिळविणें, ( ३ ) शेतीच्या मालावरील निर्गत व एक्साइज पट्टयांचा कांहीं भाग राष्ट्रीय संस्थेसाठी राखून ठेवणें, आणि ( ४ ) ज्यांचा धंदा किफायतशीर होऊं शकत नाहीं, अशा शेतकऱ्यांना कर्जाबरोबर सबसिडीहि देणें. इंटरनॅशनल बँकेसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांनीं शेत-सुधराईसाठी अधिक कर्जपुरवठा करावा आणि कॉलेजांतून व विद्यापीठांतून शेतीच्या पतीबाबत शिक्षणाची व्यवस्था करावी, अशीहि परिषदेची शिफारस आहे.

श्री. वर्दे यांच्या मतें, मध्यवर्ती क्रेडिट कॉर्पोरेशनच्या स्थापनेकडे तातडीनें लक्ष देणें अगत्याचें आहे; इतर कोणतीहि योजना कॉर्पोरेशन इतकी प्रभावी उपयुक्त होणार नाहीं. सध्याच्या योजना अगदीं अपुऱ्या आहेत आणि सहकारी चळवळीच्या कक्षेंत प्रत्येक खेडें आलें, तरी ह्या चळवळीजवळील पुंजी पुरणार नाहीं; शेतकऱ्यांच्या सर्व गरजा भागवावयाच्या असतील, तर बाहेरील मदत लागेलच. सरकारी तगाई कर्जें, व्यापारी संस्थांचीं कर्जें, सावकार, व्यापारी बँका आणि प्रत्यक्ष रिझर्व्ह बँक ह्यांपैकीं कोणीहि अशी मदत देऊं शकणार नाहीं; त्यासाठी एका स्वतंत्र राष्ट्रीय संस्थेचीच गरज आहे आणि अशा संस्थेकडे भरपूर पैसा येत राहिला पाहिजे, असें श्री. वर्दे ह्यांचें विचारपूर्वक मत झालें आहे. राज्यवार स्थापावयाच्या अशाच प्रकारच्या संस्थांकरवीं किंवा केंद्रीय सहकारी बँकांकरवीं राष्ट्रीय संस्थेनें कर्ज वाटावें, शेतीविषयक धोरणें आखावीं, तज्ज्ञ सल्ला द्यावा, अशी श्री. वर्दे ह्यांची सूचना आहे.

" ह्या मध्यवर्ती संस्थेजवळ तरी पुरेसें भांडवल कोठून येणार ? ह्याविषयीं कांहीं तपशीलवार सूचना करतां येतील काय ? " ह्या प्रश्नास उत्तर देतांना श्री. वर्दे ह्यांनीं हिंदी परिस्थितीच्या त्यांच्या अभ्यासावर व अनुभवावर आधारलेलें उत्तर दिलें. ह्या संस्थेच्या भांडवलासाठी मध्यवर्ती व राज्य सरकारांनीं दरसाल त्यांच्या अंदाजपत्रकांत कांहीं रकम-एक टक्का किंवा त्याहून कमी-राखून ठेवावी, व्यापारी बँकांवर त्यांच्याजवळ कर्जास उपलब्ध असलेल्या रकमेपैकीं कांहीं रकम मध्यवर्ती संस्थेस देण्याची सक्ती करावी, विमा कंपन्यांनाहि हा नियम लागू करावा कारण बँकांप्रमाणें विमा कंपन्याहि खेड्यापाड्यांतून पैसा आकर्षित असतात, अशी श्री. वर्दे ह्यांची योजना आहे. ह्या योजनेप्रमाणें पैसे मिळून राष्ट्रीय संस्थेजवळ १०० कोटींचें खेळतें भांडवल लवकरच जमूं शकेल. बर्कले परिषदेनें, निर्गत व एक्साइज पट्टयांपैकीं कांहीं भाग मध्यवर्ती संस्थेस मिळावा असें सुचविलें आहे. पैसे उभारण्याचे इतरहि मार्ग सुचूं शकतील. श्री. वर्दे ह्यांनीं जर्मनी व अमेरिका येथील ह्या संबंधांतील योजनांची माहिती सांगितली. श्री. वर्दे ह्यांनीं सुचविलेल्या मध्यवर्ती संस्थेच्या स्थापनेमुळें शेतीच्या वाढीसाठी परराष्ट्रीय मदत मिळणें ज्यास्त सोपें जाईल, असा त्यांचा अंदाज आहे.

आवश्यक तेवढ्या मोठ्या प्रमाणावर शेतीस कर्जपुरवठा करावयाचा, म्हणजे त्याच प्रमाणावर व्यवहार करण्यास समर्थ असलेली मध्यवर्ती संस्था हवी, हें क्रमानेंच येतें. सहकारी चळवळीस हें सामर्थ्य प्राप्त होण्याचा संभव दिसत नाहीं, असें श्री. वर्दे ह्यांचें मत होऊं लागलेलें वरील विचारांवरून लक्षांत येईल. अर्थात, सध्याच्या परिस्थितींत दुसऱ्या योजनेच्या अभावीं, सहकारी कर्जपुरवठ्यावर भर दिला जाणें स्वाभाविक आहे. गाडगीळ कमिटीच्या रिपोर्टास पांच-सहा वर्षें झालीं, तरी मुंबई राज्यांत केंद्रीय बँकेनें केलेला लहानसा उपक्रम आणि रिझर्व्ह बँकेच्या धोरणांत सहानुभूतीची भर, ह्यांखेरीज समग्र भारताचा विचार करतां कांहीं विशेष प्रगति झालेली नाहीं. श्री. वर्दे ह्यांचे विचार ह्या परिस्थितींत विचारास चालना देतील, अशी अपेक्षा आहे.

### हत्तींकडून जमीन नांगरण्याचा प्रयोग

उत्तर-प्रदेशांत तराई भागांत रानटी हत्तींकडून जमीन नांगरून घेण्याचा प्रयोग करण्यांत येत आहे. ह्या भागांत ट्रॅक्टर्स दुरुस्त करणें बरेंच अवघड जातें; कारण सर्व भागच दळणवळणाला फारसा सुलभ नाहीं. म्हणून ट्रॅक्टरच्या नांगरला रानटी हत्ती जुंपून जमीन नांगरून पहाण्यांत येत आहे. तराई भागांत हत्तींचा सुळसुळाट फार आहे. नवीन वसाहती करून जमिनी लागवडीला आणाव्या तो त्यावर रानटी हत्तींच्या कळपांची धाड येते आणि सर्व गांव उध्वस्त होऊन जातो, आणि अधिक धान्य पिकविण्याचे प्रयत्न विफल होतात. ट्रॅक्टर्सनें शेताची नांगरणी करणें सर्वच परिस्थितींत किफायतशीर पडतें असें नाहीं. ज्या यंत्रचलित नांगरांची दुरुस्ती तावडतोब होऊं शकत नाहीं अशा नांगरामुळें उलटें नुकसानच होण्याचा संभव असतो. तराई प्रदेशांत यंत्रचलित नांगरांची वेळेवर दुरुस्ती करणें, रस्त्यांच्या अभावीं पुष्कळदां अशक्य होतें. अशा परिस्थितींत रानटी हत्तीला कामाला लावण्याची कल्पना उत्तर-प्रदेश सरकारनें आतां काढली आहे. रानटी हत्तींना पूर्वी ठार मारण्यांत येत असे. परंतु आतां जमाना बदलला आहे. हा प्रयोग जर यशस्वी झाला तर ट्रॅक्टर्सच्या नांगरटीपेक्षा हत्तींकडून करण्यांत येणारी नांगरट स्वस्त पडेल. हत्ती आपआपल्या पोटाची व्यवस्था आसपासच्या जंगलांत हिंडून स्वतःच करतात. त्यांना पूरक अन्न म्हणून थोडीशी डाळ आणि मीठ दिलें कीं काम भागतें. शिवाय हत्ती हा प्राणी क्वचितच आजारी पडतो. त्याचें आयुर्मानहि दीर्घ असतें. त्याच्या बाबतींत झिजण्याचा अगर सुटे भाग बसविण्याचा प्रश्नहि उपस्थित होत नाहीं. ट्रॅक्टर्स विकत घेण्यासाठी भारताला परकीय हुंडणावळ खर्ची घालावी लागते. तोही प्रश्न हत्तींच्या बाबतींत उद्भवत नाहीं.

---

### प्राण्यांच्या निर्यातीमुळें होणारी प्राप्ति

भारतामधून परदेशी निर्यात होणाऱ्या मालांत निरनिराळ्या प्रकारच्या प्राण्यांचाहि समावेश होतो. युरोप व अमेरिका ह्या देशांना भारत दरवर्षी सुमारें ३० लाख रुपये किंमतीचे प्राणी निर्यात करतो. एकंदर निर्यातीपैकी ७० टक्के प्राणी डॉलर्सच्या विभागांत पाठविले जातात. अलीकडेच प्रसिद्धि पावलेला पोलिओ हा रोग आणि क्षय ह्यावर संशोधन करण्यासाठी दरसाल अंदाजें १०,००० माकडें भारतामधून निर्यात केलीं जातात. किंमतीच्या दृष्टीनें पहातां अफ्रिकेंतील गोरीला वानर आणि काश्मीरमधील सायबेरिअन टायगर ह्यांचा नंबर पहिला लागतो. गोरीलाची किंमत प्रत्येकी ५,५०० डॉलर्स आहे तर टायगरच्या एका जोडीला १,६०० डॉलर्स किंमत येते. माकडांच्या किंमतीची सरासरी २६ रुपये पडते. वैद्यकीय संशोधनाखेरीज प्राणिसंग्रहालयांत ठेवण्यासाठीहि प्राणी पाठविले जातात. भारतांत प्राण्यांची निर्यात करणाऱ्या पांच कंपन्या आहेत. माकडें पिकांचा नाश फार मोठ्या प्रमाणावर करतात. दरसाल सुमारें ३०,००० टन अन्नधान्याचा नाश तीं करीत असावींत. त्यामुळें उत्तर-भारतामधील बहुतेक राज्य-सरकारें माकडांचा नाश करणास अनुकूल आहेत. तथापि लोकांच्या धार्मिक भावना आणि भूतदयेची वृत्ति ह्यांच्यामुळें माकडांचा नाश करण्याच्या कामीं अडथळे येतात. भारतांत सुमारें ४० कोटी माकडें असावींत असा अंदाज आहे. माकडांखेरीज हत्ती, काश्मिरी शहामृग, वाघ, वगैरे प्राणीहि भारतामधून परदेशीं निर्यात होतात. दरवर्षी सुमारें ६,५०० रुपयें किंमतीचे हत्ती निर्यात होतात. काश्मिरी शहामृगाच्या एका जोडीला १,००० डॉलर्स इतकी किंमत येते.

### डेक्कन बँक्स् असोसिएशनचा खुलासा

(डेक्कन बँक्स असोसिएशनच्या स्थानिक सभासद-बँकांची एक अनौपचारिक तातडीची सभा दि. १७रोजी भरली होती. असोसिएशनचे चेअरमन, श्री. धों. कृ. साठे, हे जोशी हॉस्पिटलमध्यें त्यांच्यावरील शस्त्रक्रियेनंतर विश्रांति घेत आहेत, तेथेंच त्यांच्या सोयीसाठी सभा घेतली होती. सभेस श्री. धों. कृ. साठे, श्री. ग. रा. साठे, श्री. मु. च. लोया, श्री. काकासाहेब शिंगरे, श्री. बापुराव वाळवेकर, श्री. क्षीरसागर, श्री. अप्पासाहेब चितळे, श्री. गो. गं. साठे, श्री. खोले, हे वेगवेगळ्या बँकांचे संचालक त्या त्या बँकांतर्फे हजर होते. त्यांनीं श्री. जोग ह्यांच्या "अर्था" मधील लेखांतील बँकांच्या एकत्रीकरणाच्या सूचनेचा विचार केला. सभेनंतर श्री. धों. कृ. साठे ह्यांचे सहीनें काढलेलें पत्रक खाली दिलें आहे.)

महाराष्ट्रांतील बँकांचे एकत्रीकरणासंबंधी "अर्था" चे दिवाळी अंकांत श्री. जोग यांनीं एक लेख लिहिला आहे. सदरहू लेख प्रसिद्ध झाल्यानंतर या विषयासंबंधी "अर्था"मध्यें आणखीहि कांहीं साधकबाधक लेख आले. तसेच इतर वर्तमानपत्रांतूनहि लेख आले आहेत. या लेखांमध्यें डेक्कन बँक्स् असोसिएशनचा उल्लेख आला आहे.

बँकांचें एकत्रीकरण हा बँकांच्या स्वयंनिर्णयाचा प्रश्न आहे. बँकिंग ॲक्टान्वयें रिझर्व्ह बँकेचें सर्व बँकांचें व्यवहारावर बारकाईनें लक्ष असतें. असोसिएशनमध्यें या प्रश्नावर सन १९५० चे अखेरीस विचारविनिमय झाला. परंतु त्याबाबत जीं मतें अजमावलीं, त्यावरून बँकांचें एकत्रीकरण करूं नये असें सर्वसाधारण मत दिसून आलें. तथापि या प्रश्नासंबंधीं असोसिएशनकडे पुनः विचारणा आल्या तर त्यासंबंधीं योग्य तो विचार असोसिएशन करीलच.

पुणें २. धों. कृ. साठे
दि. १४-११-१९५२ अध्यक्ष, डेक्कन बँक्स् असोसिएशन.

---

**स्वातंत्र्यानंतर भांडवलाची गुंतवणूक**—ऑगस्ट १९४७ पासूनच्या पांच वर्षांच्या कालांत भारतामधील उद्योगधंद्यांत ४०० कोटी रुपये भांडवल गुंतविण्यांत आलें, असें अधिकृतरीत्या जाहीर करण्यांत आलें आहे. ह्या कालांत भांडवल नियंत्रक अधिकाऱ्यानें १,६०७ भांडवल उभारणीचे अर्ज मंजूर केले. सर्वांत अधिक गुंतवणूक १९४८ सालांत १२५·७ कोटी रुपयांची झाली.

---


## महाराष्ट्र सहकारी विद्यालय, पुणें

या विद्यालयाचे वर्ग ता. २ जानेवारी १९५३ पासून नं. ५ बैरामजी जिजीभाई रोड, पुणें १, येथें सुरू होणार आहेत. या विद्यालयांत सुपरवायझर, बँक इन्स्पेक्टर, असिस्टंट को-ऑपरेटिव्ह ऑफिसर, खरेदी-विक्री संघाचे मॅनेजर व विविध कार्यकारी सोसायट्यांचे सेक्रेटरी या दर्जाच्या नोकरवर्गास लागणारें शिक्षण देण्यांत येतें. हा अभ्यासक्रम पुरा करून "को-ऑपरेटिव्ह डिप्लोमा" मिळवणाऱ्यांना सहकारी खात्यामध्यें नोकरीसाठीं विशेष पसंती देण्यांत येते. मॅट्रिक अगर तत्सम परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांना व सहकारी संस्था व खातें येथील नोकरवर्गास प्रवेश दिला जातो. उमेदवारांनीं दिनांक १५ डिसेंबर १९५२ च्या आंत अर्ज करावे.

वरील तारखेनंतर अर्ज आल्यास जर जागा शिल्लक असतील तरच त्या अर्जांचा विचार केला जाईल; कारण उमेदवारांची संख्या मर्यादित आहे.

एन्. पी. रणभिसे, सुपरिंटेंडेंट.

## महाराष्ट्रीय बँकांच्या एकत्रीकरणाचा प्रश्न

( लेखकः—एक बँकर )

'महाराष्ट्रीय बँकांना विनंती' हा लेख श्री. चिं. वि. जोग, पुणे यांनी 'अर्थ' दिवाळी अंकांत ता. २२-१०-५२ रोजीं प्रसिद्ध करून त्या लेखाची एक लहानशी पुस्तिकाहि छापून महाराष्ट्रांतील बँकिंगचे व्यवसायांत कार्य करणाऱ्यांच्याकडे रवाना केली असल्याचें समजतें. सदरहू लेखांत महाराष्ट्रीय बँकांनीं एकत्रित येऊन महाराष्ट्रासाठी एक मोठी व भक्कम अशी बँक तयार करावी अशी एक योजना प्रसृत केली आहे. श्री. जोग यांचे या उपक्रमामुळें बँकिंग क्षेत्रांत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या विचारास चालना दिली गेली असें दिसतें, व या विषयावर अनुकूल-प्रतिकूल अशीं मतें 'अर्था' चे अंकांतून प्रसिद्ध झालीं आहेत व होणाराहि आहेत. वास्तविक रीतीनें महाराष्ट्राच्या बँकांबाबतच्या अर्थकारणासारख्या महत्त्वाच्या विषयासंबंधीं वर्तमानपत्रीय मतप्रदर्शन शक्यतों टाळलें पाहिजे असें आमचें मत आहे; तथापि कांहीं तात्विक मुद्यांची चर्चा कांहीं एका विशिष्ट उच्च भूमिकेवरून "अर्था"सारख्या जबाबदार पत्रांत झाल्यास ती उद्बोधक व मार्गदर्शक अशी होऊं शकेल अशा हेतूनेंच या लेखांत या विषयास अनुलक्षून असलेले कांहीं मुद्दे आपणांपुढें ठेवूं इच्छितों.

### थोडी पार्श्वभूमि

बंगालमधील बँकांचे झालेल्या एकत्रीकरणानंतर, १९५० सालीं मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीज पुणे या चेंबरचे अध्यक्षपदीं असलेले श्री. जी. जी. दांडेकर यांनीं महाराष्ट्रांतील बँकांचे एकत्रीकरणाचा उल्लेख सहामाही सभेचे वेळचे भाषणांत केला होता. त्यानंतर डेक्कन बँक्स् ॲसोसिएशन पुणें या संस्थेंतहि या प्रश्नास चालना देण्याचे दृष्टीनें विचारविनिमय व्हावा म्हणून चर्चा झाली. त्या चर्चेस अनुसरून म्हणा अथवा इतर कारणानें म्हणा, कांहीं बँकांच्या एकत्रीकरणाच्या हालचाली चालू असल्याचें समजतें. नुकतेंच मराठा चेंबरचे एक सेक्रेटरी श्री. आ. रा. भट यांनीं श्री. जोग यांचे लेखाचे आधारें कांहीं बँकांना पत्रें पाठवून या विषयासंबंधीं मतेंहि मागविलीं असल्याचें समजतें व अनुकूल मतें असणाऱ्या बँकांची एक सभाहि घेण्याचा त्यांचा विचार असल्याचें समजतें. या सर्व प्रयत्नांची फलश्रुती जी काय होईल ती यथावकाश आपणांपुढें येईलच.

### महाराष्ट्रांतील बँका

महाराष्ट्रांत कार्यक्षेत्र असणाऱ्या, व प्रायः ज्या बँकांचे संचालक व संस्थापक महाराष्ट्रीय आहेत अशा सुमारें ४० बँका आहेत. या बँका अस्तित्वांत येण्याचे वेळीं सुद्धां महाराष्ट्रांत इतर कांहीं मोठ्या बँका कार्य करीतच होत्या व अद्यापीहि करीत आहेत. महाराष्ट्रांत व्यापार-उदीम, उत्पादक धंदे, महाराष्ट्रीय लोकांनीं गेल्या वीस-पंचवीस वर्षांत काढले, जोपासले, वाढीस लावले व उर्जितावस्थेस आणले. त्यांत महाराष्ट्रांत कार्यक्षेत्र असणाऱ्या लहान-मोठ्या बँकांचा फार मोठा वाटा आहे हें कोणासहि नाकारतां येणार नाहीं. एकीकडे बँकिंगची सेवा देशांतील खेडोपाड्यापर्यंत नेण्याचे प्रयत्न चालू असतांना महाराष्ट्रभर ठिकठिकाणीं कार्य करीत असलेल्या बँकांना एकत्रित आणून होणाऱ्या मोठ्या युनिटला आवश्यक ती सेवा करितां येईलच असें सांगतां येत नाहीं. मोठ्या बँकांचेकडे दाद लागत नाहीं म्हणूनच लहानलहान बँकांची उपयुक्तता लोकांना जास्त पटली. त्यांचेकडून हल्लीं मिळत असलेली सेवा एकत्रीकरणानें बंद होण्याची साधार भीति असल्यानें हा दुहेरी पेंच महाराष्ट्रांतील व्यापार व उद्योगधंद्यांना जाणवल्याशिवाय राहाणार नाहीं.

### प्रांतीयता अनिष्ट

महाराष्ट्राचे आर्थिक संघटनेंत प्रांतीयता समाविष्ट केल्यास, महाराष्ट्राचें औद्योगिक व व्यापारी दृष्ट्या नुकसान होण्याचा संभव आहे. औद्योगिक व व्यापारी दृष्टीनें महाराष्ट्र प्रांत समृद्ध बनवावयाचा असेल तर इतर प्रांतांकडूनहि मदत झाल्यास ती घेणें अत्यंत आवश्यक आहे. इतर प्रांतांतील साधन-सामुग्री उपलब्ध झाली असतांना, केवळ 'महाराष्ट्रापुरताच' प्रश्न असें म्हटल्यास आपली आर्थिक उन्नति होणार नाहीं. महाराष्ट्र, महाराष्ट्रीय भांडवल, या घोषणेनें कांहीं उद्योगधंदे कांहीं काळ विकास पावूं शकले नाहींत, असा गेल्या १५ वर्षांतील अनुभव आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक संघटनेचे बाबतींत तरी प्रांतीयता नसावी, असें मानणारा एक मोठा धनिक वर्ग महाराष्ट्रांत आहे हें विसरून चालणार नाहीं.

### सहकार्य, विलिनीकरण

देशांतील अर्थव्यवस्था सुसूत्रबद्ध राहावी व बँकांचे कामकाजांतील दोष ठेवीदारांचे हिताचे दृष्टीनें काढून टाकून बँकांचें कामकाज राष्ट्रास परिपोषक व्हावें या दृष्टीनें 'बँकिंग ॲक्ट' अंमलांत आला. या कायद्याचा इष्ट असाच परिणाम होऊन बँकांचे व्यवहारांतील दोष हळूं हळूं निघत असून त्या संस्था अधिक कार्यक्षम व मजबूत होत जातील अशी परिस्थिति आहे. हल्लीं अस्तित्वांत असलेल्या बँकांच्या शाखांचा विस्तार, त्यांचें भांडवल, त्यांची अंतर्गत कार्यपद्धति, या गोष्टींकडे रिझर्व्ह बँकेचें लक्ष असून, बँकांना जरूर त्या ठिकाणीं सल्लामसलत देण्याचें कार्यहि ती करीत असते या सर्व गोष्टींमुळें बँकांतील ठेवीदारांना पूर्वीपेक्षा आतां अधिक सुरक्षितता प्राप्त झाली आहे. 'बँकिंग ॲक्ट' मधील कांहीं कलमांनुसार ज्यांना अवश्य त्या तरतुदी करणें अवघड जात असतील अशा बँकांनीं आपले अडचणींचे प्रश्न इतर बँकांचे सहकार्यानें सोडविण्याचा प्रयत्न करावा तसें ते नच जमल्यास बँकांनीं आपलें जरुरीप्रमाणें सोयीस्कर अशा बँकेशीं विलीन होणें हेंच श्रेयस्कर आहे.

### महाराष्ट्रासाठी कल्पलेली बँक

बंगाल्यांत कांहीं विशिष्ट परिस्थितीनें तेथील कांहीं बँका एकत्रित येऊन 'युनायटेड बँक ऑफ इंडिया' बँक निर्माण झाली. राजस्थानमधील बँकांचें मागील संस्थानांचा आधार गेल्यामुळें तेथील तीन बँका एकत्र येण्याचें घाटत आहे. ही विचारसरणी पुढें ठेवून महाराष्ट्रांतील बँकांनीं एकत्र येऊन एक मोठी व भक्कम बँक महाराष्ट्रासाठी निर्माण करावी असें श्री. जोग यांनीं सूचित केलें आहे. यदाकदाचित् त्यांचे सूचनेप्रमाणें ही गोष्ट घडून आली तरी ही नवीन निर्माण होणारी बँक हिंदुस्थानांतील मोठ्या बँकांचे तोडीची व त्यांचे बरोबरीनें धंद्यांत टक्कर देण्यास समर्थ होईलच असें वाटत नाहीं. श्री. जोग यांचे विचारसरणीस थोडें पुढें नेऊन असेंहि सुचवितां येईल कीं, मुंबई प्रांताकरितां एक मोठी बँक स्थापन करावी व त्यांत प्रांतांतील सर्व बँकांनीं समाविष्ट व्हावें. अर्थात् या काल्पनिक गोष्टींत व्यवहार्यता किती, उपयुक्तता अगर कार्यक्षमता किती, याचा प्रांतांतील परिस्थितीनुरूप सखोल अभ्यास करूनच ते विचार मांडले पाहिजेत.

### महाराष्ट्रांतील बँकांचें सहकार्य-( को-ऑर्डिनेशन )

महाराष्ट्रांतील मोठ्या उद्योगधंद्यांचे दृष्टीनें उत्पन्न होणारे जे अनेकविध प्रश्न आहेत त्यांतील महत्त्वाचे म्हणजे उद्योगधंद्यांना

लागणारीं कांहीं प्रमाणांतील लांब मुदतीचीं कर्जें, खेळते भांडवली प्रश्न, चिठें, डिस्कौंटिंग वगैरे सारखे प्रश्न बँकांचे सहकार्यानें सुटण्याजोगे आहेत. या दृष्टीनें बँकांच्या प्रभावी को-ऑर्डिनेशनची योजना तयार केल्यास बँकांचा शाखांवर होणारा दुहेरी खर्च, व्याजाचे दरांतील चढाओढ, सर्व बँकांची कार्यपद्धति एक ठेवण्याचें धोरण, अशा सर्व महत्त्वाच्या बाबी करतां येण्याजोग्या आहेत. या को-ऑर्डिनेशनचे धोरणानुसार ज्या त्या बँकेचें अस्तित्व व क्षेत्र स्वतंत्र राहून बँकांचे कार्यपद्धतींत एकसूत्रीपणा आणतां येऊन त्या त्या बँका आपल्या क्षेत्रांत अधिक कार्यक्षम होतील असा भरंवसा वाटतो. या सूचनेचाही या क्षेत्रांतील कार्यकर्त्यांनीं अवश्य विचार करावा.

**इंदूरजवळ ग्रामसुधारणेची योजना**—इंदूर-महू रस्त्यावर इंदूरपासून दोन मैलांवर असलेल्या पांढा ह्या गांवीं ग्रामसुधारणेची एक प्रायोगिक योजना १० नोव्हेंबरपासून सुरू करण्यांत आली.

### संयुक्त राष्ट्रसंघटनेचा संस्कृति-महाल

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या शास्त्र व संस्कृतिशाखेसाठी पॅरिसच्या प. भागांत २८६·७ कोटी फँक्स खर्चून एक इमारत बांधण्याचें ठरलें आहे. ही इमारत १६ मजली होईल. ती २०० फूट उंच आणि ३०५ फूट लांब असेल. इमारतीचा नकाशा मंजूर झाला असून ती १९५५ सालीं पुरी होईल.

### इटलींत पाऱ्याचें सर्वांत अधिक उत्पादन

दुसऱ्या महायुद्धापूर्वी इटलीमध्यें जगांत उत्पादन होणाऱ्या पाऱ्यापैकीं निम्मा पारा उत्पादन होत असे. युद्धानंतर पाऱ्याच्या कांहीं खाणी युगोस्लाव्हिआंत गेल्यामुळें उत्पादन घटलें होतें. परंतु आतां दरवर्षी ५३५ टन पारा निर्माण होऊं लागला आहे. हें उत्पादन जगांतील पाऱ्याच्या उत्पादनाच्या ३१·६ टक्के आहे.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें २

महाराष्ट्रीय जनतेच्या साहाय्यानें

## साखरेचें उत्पादन कायमचें वाढविलें आहे

सिंडिकेट

— नवीन ठेवी, ठेवींचा बोजा वाढविण्याकरितां घेत नाहीं —

मशिनरीकरितां घेतलेल्या एक वर्ष मुदतीच्या ठेवी परत करण्याकरितां तीन वर्षें ७ टक्के दराच्या ठेवी घेत आहे.

मशिनरीकरितां "शेअर मांडवल" हें अर्थशास्त्र

- परंतु कार्यसिद्धीकरितां -

— शास्त्रापेक्षा रूढीप्रमाणें वागावें लागतें —

☆ कार्यसिद्धि झालेली आहे ☆

दहा वर्षें १०% डिव्हिडंड देणारी सिंडिकेट तीन वर्षें ७% व्याज देऊं शकतें.

**कोणाहि ठेवीदाराची एक पै बूड होणार नाहीं**

याची हमी

( १ ) नवीन एक हजार टनांची मशिनरी व दोन हजार एकर ऊंस यांनीं घेतली आहे.

( २ ) याशिवाय जुनी मशिनरी विक्रीकरितां शिल्लक आहे.

:: ठेवींच्या व्याजाचे दर ::

| | | | |
|---|---|---|---|
| मुदत तीन वर्षें | ... | व्याज | ७ ( सात ) टक्के |
| मुदत दोन वर्षें | ... | व्याज | ६॥ ( साडेसहा ) टक्के |
| मुदत एक वर्ष | ... | व्याज | ६ ( सहा ) टक्के |

**शेअर-विक्री सुरू आहे.**

शेअर व ठेवीचे फॉर्म सिंडिकेटच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

१८०, सदाशिव पेठ,<br>कॉमनवेल्थ बिल्डिंग,<br>लक्ष्मी रोड,<br>पुणें २.<br>दि. ९ नोव्हेंबर १९५२.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,<br>बी. ए., एलएल. बी.,<br>सी. जी. आगाशे ॲण्ड को.,<br>मॅनेजिंग एजंटस्.

## बँकिंग प्रदर्शन व व्याख्यानें

'अर्थाचे' ता. ५ नोव्हेंबर १९५२ चे अंकांतून 'पुणें बँकिंग असोसिएशन' ची जाहीर विनंती प्रसिद्ध करणेंत आलीच आहे. त्या विनंतीप्रमाणें अनेक स्थानिक व बाहेरील बँकांकडून चेक, ड्राफ्ट, हुंडी वगैरेंचे फार्म प्रदर्शनाकरितां पाठविणेंत आले आहेत. अद्यापि जर कांहीं बँकांकडून सदर फॉर्म पाठविणेचें राहिलें असल्यास ते पाठविणेची चालकांची विनंती आहे.

पूर्वी जाहीर झालेलें प्रदर्शन व व्याख्यानें यांचे कार्यक्रमांत डेक्कन बँक्स असोसिएशन, पुणें ही संस्था सहभागी झाली असून हें कार्य आतां दोन्ही संस्था मिळून करीत आहेत. रविवार ता. ३० ११-५२ रोजीं प्रदर्शनाचें उद्घाटन श्री. प्राणलाल देवकरण नानजी, प्रेसिडेंट, इंडियन बँक्स असोसिएशन यांचे हस्तें दुपारीं ३ वाजतां होणार असून त्यावेळीं डॉ. एस्. जी पाणंदीकर, एम्. ए., पी. एच्. डी., यांचे 'बँकिंग सिन्स इंडिपेंडन्स' या विषयावर व्याख्यान होणार आहे. सोमवार ता. १।१२।५२ रोजीं श्री डी. एस्. सावकार, डिरेक्टर, बँकिंग रिसर्च, रिझर्व बँक ऑफ इंडिया, मुंबई, हे 'प्लेस ऑफ बँकिंग इन फाइव्ह इयर प्लॅन' या विषयावर बोलणार आहेत.

प्रदर्शन व व्याख्यानांचे कार्यक्रमास सर्व बँकांनीं व जनतेनें जरूर भाग घ्यावा अशी नम्र विनंती आहे.

| | |
|---|---|
| **डी. एन्. गांडेकर** | **म. व्यं. ढिंगरे** |
| ऑन. सेक्रेटरी, | ऑन. सेक्रेटरी, |
| (न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया) | डेक्कन बँक्स् |
| सी. व्ही. जोग (बँक ऑफ महाराष्ट्र लि.) | असोसिएशन |
| बी. बी. पुरोहीत (सेंट्रल बँक ऑफ इंडिया) | |

पुणें बँकिंग असोसिएशन, सभासद
कार्यकारी मंडळ.

---

### कवठे महांकाळ येथें 'विकास-योजनेंत सहकाराचें स्थान'

द. सातारा जिल्हा को. बोर्डाच्या विद्यमानें कवठे महांकाळ ता. मिरज येथें मे डी. ए. सावंत, डिस्ट्रिक्ट को. ऑफिसर, कोल्हापूर यांचे अध्यक्षतेखालीं सहकारी दिन साजरा करणेंत आला. सदर समारंभास कवठे महांकाळ, कुची, हिंगणगांव व रांजणी वगैरे आसपासचे खेड्यांतील सहकारी कार्यकर्ते अदमासें २००-२५० हजर होते. सदर प्रसंगास अनुसरून श्री. एन्. टी. पाटील, नगराध्यक्ष कवठेमहांकाळ नगरपालिका, श्री. खानसाहेब अमीरसाहेब, श्री. व्ही. एम् पाटील असि. डेप्यु एज्यु. ऑफिसर, श्री. गोरे हेडमास्तर, वगैरे वक्त्यांनीं प्रसंगोचित भाषणें केलीं. अध्यक्षांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत 'विकासयोजनेंत सहकाराचें स्थान' या विषयावर सुमारें तास दीड तास माहितीपूर्ण वक्तव्य केलें.

श्री. डी. बी. निकम यांनीं अध्यक्ष, सहकारी कार्यकर्ते व प्रतिष्ठित सद्गृहस्थ यांचे आभार मानले.

---

### पूना पोस्टल बँकेंत गुमास्ता कायद्याची चर्चा

'सहकारी दिन' श्री. बी. विठ्ठलराव, बँकेचे प्रेसिडेंट, यांचे अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला. श्री. डी. के. पुरंदरे, बी. ए., एलएल्. बी., वकील यांचें 'सहकारी संस्था व गुमास्ता कायदा' या विषयावर भाषण झालें. व्याख्यात्यांनीं गुमास्ता कायदा सहकारी संस्थांना लागू करूं नये, याबद्दल मुद्देसूद विवेचन केलें.

### सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास, धुळें

तारीख २७ आगस्टपासून सहकारी सोसायट्यांचे सेक्रेटरीसाठी धुळें येथें एक ट्रेनिंग क्लास घेण्यांत आला होता. सदर वर्गाचा फायदा ४६ उमेदवारांनीं घेतला. वर्गात सहकारी चळवळींतील कार्यकर्ते व खात्याचे अधिकारी यांनीं सहकारी चळवळीबद्दल नियुक्त विषयाबद्दल सेक्रेटरींना माहिती दिली. सदरहू वर्गाचा समारोप-समारंभ पुणें येथील को. कॉलेजचे प्रोफेसर श्री. के. व्ही. देवधर यांचे हस्तें मोठ्या उत्साहानें पार पडला. म. पौलाद पाटील डि. लो. बोर्ड, असि. रजिस्टार, को. सो. धुळें ह्यांचीं समयोचित-भाषणें झालीं.

---

**किर्लोस्कर बंधु, लिमिटेड, किर्लोस्करवाडी (द. सातारा)**

## नोटीस

मेसर्स किर्लोस्कर बंधु, लिमिटेड, या कंपनीच्या भागीदारांची बत्तीसावी वार्षिक साधारण सभा किर्लोस्करवाडी, जि. दक्षिण सातारा येथें कंपनीच्या बिझिनेस ऑफिसमध्यें शनिवार ता. ६ डिसेंबर १९५२ इसवी रोजीं दोन प्रहरीं ३-३० वाजतां (स्टँ. टा.) भरणार आहे.

सभेपुढील विषयः—

१. डायरेक्टरांनीं व ऑडिटरांनीं केलेला रिपोर्ट व तारीख ३१ जुलै १९५२ अखेर ऑडिटरांनीं तपासलेला ताळेबंद आणि नफा-तोटा पत्रक स्वीकारून त्याला मंजुरी देणें.

२. डिव्हिडंड देण्याबद्दल मंजुरी देणें.

३. (अ) पाळीप्रमाणें निवृत्त होणारे डायरेक्टर (१) श्री एस्. जी. मराठे (२) श्री. व्ही. पी. वर्दे व (३) श्री. एस्. बी. खेर यांच्या जागीं नवीन डायरेक्टरांची निवड करणें. निवृत्त होणारे डायरेक्टर पुन्हा निवडून येण्यास पात्र असून निवडणुकीस उभेहि आहेत.

(ब) रा. ब. जी. जी. शेंबेकर हे आर्टिकल १०४ प्रमाणें निवृत्त होत आहेत व ते पात्र असल्यानें निवडणुकीस उभे आहेत.

४. चालू सालाकरितां एक अथवा अधिक ऑडिटर नेमणें व त्यांचा मुशाहिरा ठरविणें.

कंपनीचीं शेअर ट्रॅन्सफर बुकें आणि रजिस्टर ऑफ मेंबर्स हीं ता. २९ नोव्हेंबर १९५२ ते ता. १३ डिसेंबर १९५२ अखेर (पहिला व शेवटचा दिवस धरून) बंद रहातील.

बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे हुकुमावरून
**किर्लोस्कर सन्स आणि कंपनी,**
मॅनेजिंग एजन्टस्.

**किर्लोस्करवाडी जि. द. सातारा**
**ता. १ नोव्हेंबर १९५२**

---

**सूचना** १. वरील सभेंत डिव्हिडंड मंजूर झाल्यावर ज्या भागीदारांचीं नांवें कंपनीच्या शेअर रजिस्टरवर तारीख ६ डिसेम्बर १९५२ रोजीं आहेत त्यांच्याकडे भागीदारांच्या सोयीसाठी डिव्हिडंड वारंटें अगर डिव्हिडंडची रक्कम मनिऑर्डरीनें ता. १५ फेब्रुवारी १९५३ नंतर त्यांच्या नांवाच्या (अक्षर-विल्हेवारीच्या) अनुक्रमानें पाठविण्यांत यावयाची आहे.

२. डिव्हिडंडची रक्कम ५० रुपयांपेक्षां जास्त असल्यास त्याबद्दल डिव्हिडंड वारंट पाठविण्यांत येईल व हें वारंट दि बॉंबे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, शाखा-किर्लोस्करवाडी, या बँकेवरील मिळेल व ५० रु. किंवा ५० रुपयांपेक्षा कमी रक्कम असल्यास ते मनिऑर्डरीनें पाठविण्यांत येईल.

३. भागीदारांनीं आपला पत्ता बदलला असल्यास कंपनीकडे ही नोटिस पोहोंचतांच ताबडतोब कळवावा.

### शिवण्याच्या यंत्रांत जपानची स्पर्धा

दुसऱ्या महायुद्धानंतर सर्व 'जगांत चांगली शिवण्याची यंत्रें पुरविण्याचा मक्ता जवळ जवळ जर्मन कारखान्यांकडे गेला होता. पण आता त्यांना जपानी शिवण्याच्या यंत्रांची चांगलीच स्पर्धा होऊं लागली आहे. बेल्जममध्यें तर जपानी यंत्रांचा सुळसुळाट झाला आहे. जर्मन यंत्रांच्या विक्रींत बरीच घट झाल्यामुळें त्याविरुद्ध काय उपाय करावा ह्यासंबंधीं विचार सुरू झाला आहे. जर्मन कारखानदारांचें म्हणणें असें आहे कीं, जपानी यंत्रें अद्यावत् पद्धतीचीं नाहींत आणि त्यांची बनावट सुबक नाहीं. तथापि किंमती मात्र बऱ्याच कमी आहेत. जर्मन कारखानदार लवकरच चांगल्या प्रतीचीं पण स्वस्त अशी शिवण्याची यंत्रें उत्पादन करणार आहेत जपानी यंत्रें खपण्याच्या मार्गांत आणखीहि कांहीं अडचणी आहेत. एका बेल्जम विक्रेत्यानें आपला अनुभव पुढीलप्रमाणें सांगितला. तो म्हणाला कीं, जपानकडून ३०० शिवण्याचीं यंत्रें मागविलीं होतीं. तीं आल्याबरोबर तावडतोब खपलीं नंतर मी आणखी कांहीं यंत्रें मागविलीं पण तीं लवकर मिळत नाहींत; महिनेच्या महिने थांबावें लागतें. जपानी कारखानदारांच्या एक गोष्ट लक्षांत येत नाहीं असें दिसतें. ती म्हणजे बेल्जजिन फ्रँकबद्दल डॉलर्स सहजासहजीं मिळूं शकतात. जपानला दुर्मिळ असलेले डॉलर्स मिळविण्याचा हा एक मार्ग फार सोपा आहे. जपानी निर्यात व्यापाऱ्यांच्या लक्षांत ही गोष्ट आल्यास ते बेल्जमला अधिक तांतडीनें शिवण्याच्या यंत्रांचा पुरवठा करूं लागतील ह्यांत शंका नाहीं. व्यापारी क्षेत्रांत मागासलेलीं राष्ट्रें आणि पुढारलेलीं राष्ट्रें ह्यांच्यांतच केवळ स्पर्धा चालेल अशी सामान्य समजूत आहे. पण पुढारलेल्या राष्ट्रांनाही आपले उद्योगधंदे सांवरण्यासाठी कशी स्पर्धा करावी लागते, तें वरील माहितीवरून कळून येतें.

---

**सुवर्णकारांची परिषद**—सीलोनमधील आणि द. भारतामधील सुवर्णकारांची एक परिषद चिदंबरम् येथें पुढील महिन्यांत भरणार आहे. परिषदेला १०० प्रतिनिधी हजर रहातील. अशा प्रकारची ही पहिलीच परिषद आहे.

**ऑल इंडिया रेडिओला आलेलीं पत्रें**—१९५२ सालीं ऑल इंडिआ रेडिओकडे देशांतील श्रोत्यांकडून १,५३,२४५ पत्रें आणि परदेशांतील श्रोत्यांकडून ४२,९२७ पत्रें आलीं. श्रोत्यांच्याकडून आलेल्या सूचनांचा अधिकाऱ्यांनीं काळजीपूर्वक विचार केला.

**नैसर्गिक गॅसचा सांठा**—बलुचिस्तानमध्यें एका ठिकाणीं तेलाची विहीर खोदण्याचें काम चालू असतां नैसर्गिक गॅसचा मोठा सांठा सांपडल्याची बातमी आहे. १०,००० फूट खोल खणूनसुद्धां तेल मात्र सांपडलें नाहीं. ह्या गॅसचा उपयोग जळणासाठीं होऊं शकेल.

**दिल्लीमधील आगीमुळें झालेलें नुकसान**—१९५१-५२ सालांत दिल्ली शहरांत आगीमुळें ११,१६,००६ रुपयांचें नुकसान झालें आणि २८ माणसें दगावलीं आगींत सांपडलेल्या २७ जणांना जखमा झाल्या; २२ जणांना बंबवाल्यांनीं वांचविलें.

**चहासाठी अमेरिकन गिऱ्हाईक**—अमेरिकेच्या टी असोसिएशनचे अध्यक्ष मि. व्हिनिकोंब चहाच्या व्यापारासंबंधीं बोलणीं करण्यासाठी भारताला आले आहेत भारताच्या चहाच्या उद्योगधंद्याचे प्रतिनिधी आणि भारतीय सरकारचें व्यापारखातें ह्यांच्याशीं ते बोलणीं करतील.


**ठेवी स्वीकारण्यांत येतात**

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७५ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन ३२७३८ तारेचा पत्ता: 'PEDNECO' Bombay

१९५२ मूल्यमापनाचें वर्ष १९५२

**दि सेन्ट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कंपनी लि.**

पहिल्या मूल्यमापनांत कंपनीनें बोनस जाहीर केलें आहे. येत्या मूल्यमापनांतील बोनसचे भागीदार होण्यासाठीं, आजच पॉलिसी घ्या.

सर्वत्र एजन्सीज देणें आहेत.

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई. — शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर

**बँक ऑफ पूना लि.**

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल : | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें : | २५,००,००० |
| वसूल भांडवल : | १२,५०,००० |

**—संचालक मंडळ—**

१ श्री. मुरलीधर चतुर्भुज लोया, चेअरमन
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी.
३ डॉ. नारायण भिकाजी परुळेकर M. A. Ph. D. संपादक, सकाळ, पुणें.
४ श्री. फ्रामजी पी. पोचा, बियांचे व्यापारी.
५ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी
६ श्री. गणपतराव काळूराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

शाखा—(१) भवानी पेठ, पुणें. (२) सदाशिव पेठ, पुणें. (३) सोलापूर (४) सांगली.

व्याजाचे दर-चालू ठेव १/२ टक्का. सेव्हिंग्ज १॥ टक्का.

मुदत ठेव : १ वर्ष ३ टक्के, ५ वर्षे ४ टक्के.

एक वर्षापेक्षां कमी मुदतीच्या ठेवींवर आकर्षक व्याज.

मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत लॉकर्सची सोय.

मुख्य ऑफिस : ४५५ रविवार, पुणें २. — गो. गं. साठे, मॅनेजर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८०३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें